# उपमुख्यमंत्री अजित पवारांचा विमान अपघातात मृत्यू

**दिन विशेष...**

१२७४ : श्री.संत ज्ञानेश्वर महाराजांचे श्रीगुरू निवृत्तीनाथ यांचा जन्म.
१५०६ : कोलंबस या थोर दर्यावर्दीचे निधन झाले.
१६१६ : दासोपंत देशपांडे यांचे निधन झाले.
१७८१ : भारतातील पहिले वृत्तपत्र 'दि बेंगॉल गॅझेट' चा प्रारंभ झाला.
१८७१ : राजकवी चंद्रशेखर गोऱ्हे यांचा जन्म झाला.


महाराष्ट्राचे निडर दैनिक
# शौर्य मराठी
RNI-MAHMAR/2023/89125


सेन्सेक्स ८१,५३७.७० -७६९.६६ (०.९४%)
डॉलर ₹ ९१.९१

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३० | १६ |
| दिल्ली | १८ | ०७ |
| मुंबई | ३१ | १८ |
| नागपूर | २९ | १६ |
| पुणे | ३० | ११ |


epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | गुरूवार, दि. २९ जानेवारी २०२६ | वर्ष २ रे | अंक ८० किंमत : ५ रु. | पाने ४


# सहा जणांचा मृत्यू; पवारांवर आज अंत्यसंस्कार

## लँडिंगवेळी बारामतीत दुर्घटना; तांत्रिक बिघाड, खराब हवामानामुळे अपघाताची शक्यता?

वृत्तसंस्था । पुणे

**राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमानाला अपघात झाल्याची माहिती समोर आलीय. मुंबईहून पुण्याकडे म्हणजेच बारामतीकडे येत असताना हा अपघात झाला आहे. जिल्हा परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अजित पवार हे सभेसाठी बारामतीला आले होते. या अपघातग्रस्त ठिकाणाचा व्हिडीओ समोर आलाय, या अपघातवेळी अजित पवार यांचे पीए आणि काही जवळचे लोक सोबत होते, सर्वांचा अपघातामध्ये मृत्यू झाला आहे. लँडिंग करताना विमानाला अपघात झाला आणि विमानाने पेट घेतला आणि आगीत सर्व खाक झाले.**

बारामती विमानतळाजवळील लँडिंग करताना एका शेतामध्ये विमान कोसळलं. हा अपघात ८.४५ ते ९.०० वाजेदरम्यान झाल्याचे समजते. अपघातग्रास्त विमान आगीत पूर्णपणे खाक झाले. विमान अपघातामध्ये सहा जणांचा मृत्यू झाल्याची माहिती डीजीसीएने दिली आहे. विमानाचा अपघात नेमका कशामुळे झाला? याबाबत विमानतळ प्रशासनाकडून अधिकृत माहिती आलेली नाही. तांत्रिक बिघाड व खराब हवामानामुळे हा अपघात झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. विमानामध्ये वैमानिकासह एकूण सहा जण होते. अजित पवारांच्या निधनाची बातमी आली तेव्हा सर्व पवार कुटुंब हे दिल्लीमध्ये एकत्र होतं. या अपघाताची बातमी समजल्यावर सर्व पवार कुटुंब बारामतीच्या दिशेने रवाना झाले होते. राष्ट्रवादीच्या नेत्यांसाठी हा मोठा धक्का असून दादांच्या अकाली एक्झिटने हळहळ व्यक्त होत आहे.

अजित पवार हे याआधीही अनेकदा अपघातातून बचावले होते. अपघाताचे अनुभव सांगताना मिश्किल विनोद करून इतरांना हसवणारे पवार आज मात्र या अपघातातून वाचू शकले नाहीत. त्यांच्या निधनाने राज्यावर शोककळा पसरली आहे. राजकारणापलीकडे



विविध राजकीय नेत्यांपासून ते सामान्य कार्यकर्त्यांपर्यत अशा सर्वच स्तरातून शोक व्यक्त केला जात आहे.

**दौऱ्यावर असतानाच अपघात**

आगामी जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अजित पवार बुधवारी बारामती दौऱ्यावर होते. आज दिवसभरात त्यांच्या चार महत्त्वाच्या सभा नियोजित होत्या. याचसाठी ते सकाळी विमानाने बारामतीला पोहोचले मात्र विमानतळावर लँडिंग करत असतानाच हा विमानाचा अपघात झाला.

**अजित पवारांसह या सहा जणांचा झाला मृत्यू**

यात अजित पवारांसह मुंबई पीएसओ विनित जाधव, पायलट कॅप्टन सुमित कपूर, कॅप्टन संभवी पाठक, पिंकी माळी, फ्लाईट अटेंडंट होते. या सर्वांचा यात मृत्यू झाला आहे. मुंबईतून हे विमान सकाळी ८ वाजून १० मिनिटांनी निघाले होते. तर, बारामती येथे ८.५० मिनिटांनी पोहोचले. लँडिंग करत असतानाच या विमानाचा अपघात झाला अन् आतील प्रवाशांचा मृत्यू झाला. अपघात झाला त्यावेळी पवार कुटूंबिय एका समारंभासाठी दिल्लीला होते. अपघाताची माहिती मिळताच ते तातडीने बारामतीकडे निघाले, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

**शासकीय सुटी जाहीर**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विमान अपघातात निधन झाल्याने राज्य सरकारने बुधवारी शासकीय सुटी जाहीर केली. त्या पार्श्वभूमीवर शालेय शिक्षण विभागाने राज्यातील सर्व शाळांना सुटी जाहीर केली. तसेच मुंबई विद्यापीठाने दुपारच्या सत्रामध्ये होणाऱ्या सर्व परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला. यासंदर्भात मुंबई विद्यापीठाकडून सर्व संलग्न महाविद्यालयांचे प्राचार्य, सीडीओई यांना कळविण्यात आले आहे.



## घड्याळ आणि गॉगलवरून आम्ही अजितदादांना ओळखलं : प्रत्यक्षदर्शी

एवढा मोठा स्फोट झाला की कोणीच काहीच करू शकत नव्हतं. मग अग्निशमन दल आले, त्यांनी पाणी मारून आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. विमान खाली आल्यावर स्फोट झाला. इतका मोठा स्फोट झाला की आम्ही खूप घाबरलो होतो. पोलिसांनी आम्हाला पाणी आणायला लावलं. आम्ही बादलीने पाणी आणलं. अजित पवारांचा मृतदेह साईडला उडून पडला होता. आम्ही ते प्रत्यक्षात पाहिलं. आम्ही नवीन ब्लँकेट दिलं. त्यात त्यांना गुंडाळून ठेवलं. आग जवळपास अर्धातास धूमसत होती, असं एका प्रत्यक्षदर्शी महिलेने सांगितलं. तसंच, आम्ही गॉगल आणि घड्याळावरून ओळखलं की हे अजितदादा आहेत. त्यामुळे सुरुवातीला आम्ही दादांची बॉडी काढली, असं एका प्रत्यक्षदर्शीने सांगितलं.

## आज सकाळी ११ वाजता अंत्यसंस्कार

अजित पवारांचं पार्थिव आज सायंकाळी ४ वाजल्यापासून विद्याप्रतिष्ठान विद्यानगरी चौक येथील मैदानात अंत्यदर्शनाकरता रात्री उशिरापर्यंत नागरिकांसाठी ठेवण्यात येणार आहे. उद्या (२९ जानेवारी) सकाळी ९ वाजता गदिमा सभागृहापासून अंत्ययात्रा निघेल. गदिमा चौक, विद्यानगरी चौक, विद्याप्रतिष्ठानचा अंतर्गत रस्ता, मराठी शाळेच्या गेटने विद्याप्रतिष्ठानच्या मैदानावर जाईल. सकाळी ११ वाजता विद्याप्रतिष्ठानच्या मैदानावर अंत्यसंस्कार होईल.

## मोदींनी व्यक्त केला शोक

अजित पवार हे जनतेशी घट्ट नाते असलेले, तळागाळाशी मजबूत नाळ असलेले लोकनेते होते. महाराष्ट्रातील जनतेच्या सेवेत सदैव अग्रभागी राहणारे एक मेहनती व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांना व्यापक आदर होता. प्रशासकीय बाबींची त्यांना सखोल जाण होती. गरीब आणि वंचितांच्या सक्षमीकरणासाठीची त्यांची तळमळ विशेष उल्लेखनीय होती. त्यांचे अकाली निधन अत्यंत धक्कादायक व दुःखद आहे, अशी भावना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केली आहे.

## राज्यात ३ दिवसाचा दुखवटा : मुख्यमंत्री फडणवीस गहिवरले

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानं कधीही भरून न येणारी महाराष्ट्राची हानी झाली आहे. आज त्यांचे विमान अपघातात निधन झाले. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात शोककळा पसरली आहे. अजित पवार महाराष्ट्राचे लोकनेते होते. महाराष्ट्रातल्या प्रश्नांची जाण असलेला हा नेता होता. त्यांच्याबद्दल जनसामान्यांमध्ये प्रचंड आस्था होती. अतिशय संघर्षशील असं नेतृत्व होते. सर्व परिस्थितीत न डगमगता पुढे जाणारे व्यक्तिमत्व होते. महाराष्ट्रासाठी आजचा दिवस अत्यंत कठीण दिवस आहे, अशी शोक भावना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली. अजित पवारांच्या निधनावर देवेंद्र फडणवीस म्हणाले की, अजित पवारांसारखे नेतृत्व तयार व्हायला अनेक वर्ष लागतात. ज्यावेळी महाराष्ट्राच्या विकासात ते महत्त्वपूर्ण योगदान देत होते, त्या काळात त्यांचे निघून जाणे हे अविश्वसनीय आणि मनाला चटका लावणारे आहे. माझ्यासाठी दमदार, दिलदार मित्र सोडून गेला आहे. त्यांच्या कुटुंबावर हा प्रचंड मोठा आघात आहे. मी, एकनाथ शिंदे लवकरच बारामतीकडे निघणार आहे. पंतप्रधान, गृहमंत्री यांना फोनवर घटनेची माहिती दिली आहे. त्यांनाही हा धक्का होता. त्यांनी प्रचंड दु:ख व्यक्त केले. पुढच्या सर्व गोष्टी कुटुंबाची चर्चा करून ठरवण्यात येतील असं फडणवीसांनी सांगितले.

## हा निव्वळ अपघात, यात कोणीही राजकारण आणू नये : शरद पवार

अजित पवारांच्या अपघाती मृत्यूवर प्रतिक्रिया देताना शरद पवारांना देखील अश्रू अनावर झाले होते. 'हा निव्वळ अपघात असून यात कोणीही राजकारण आणू नये, अशी प्रतिक्रिया शरद पवार यांनी दिली आहे. अजित पवार यांचा अपघाती मृत्यू हा महाराष्ट्राला प्रचंड मोठा धक्का आहे. एक कर्तृत्ववान आणि निर्णय घेण्याची शक्ती ज्यांच्यात आहे, अशा व्यक्तीला महाराष्ट्र आज मुकला आहे. जे काही नुकसान झालंय ते भरून निघणारं नाही, पण सगळ्याच गोष्टी काही आपल्या हातात नसतात, असं शरद पवार यांनी म्हटलं आहे.

## विकासाचा कणखर आधार हरपला : ना.पाटील

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाती निधनाने महाराष्ट्राने एक कणखर, अनुभवी आणि विकासाभिमुख नेतृत्व गमावले असल्याची भावना पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी व्यक्त केली. पवार यांचे निधन ही अत्यंत धक्कादायक, वेदनादायक आणि मन हेलावून टाकणारी घटना आहे. वक्तशीरपणा, निर्णयक्षमता आणि प्रशासनावरची मजबूत पकड यासाठी ते ओळखले जात होते. सभागृहातील शिस्तबद्ध वर्तन, सर्वसामान्यांबद्दलची आपुलकी आणि राज्याच्या विकासासाठी असलेली तळमळ हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा स्थायी भाव होता. विरोधकांनाही आदराने वागवणारे अशी ओळख असलेले अजितदादा हे बारामतीचे किल्लेदार म्हणून केवळ आपल्या मतदारसंघापुरते मर्यादित न राहता संपूर्ण महाराष्ट्राच्या विकासासाठी सातत्याने कार्यरत होते. राज्याच्या प्रगतीसाठी त्यांनी घेतलेले धाडसी निर्णय आणि दिलेले योगदान कायम स्मरणात राहील. या दुःखद घटनेमुळे पवार कुटुंबीयांसह संपूर्ण महाराष्ट्रावर शोककळा पसरली असून राज्याच्या राजकारणात एक मोठी पोकळी निर्माण झाली आहे, असे त्यांनी सांगितले.

## प्रभावी लोकनेता गमावला : आ.खडसे

अजित पवार यांच्या जाण्याने राज्याच्या राजकारणाला आणि सार्वजनिक जीवनाला मोठा धक्का बसल्याची भावना माजी मंत्री एकनाथ खडसे यांनी व्यक्त केली आहे. अजित पवार हे कर्तव्यदक्ष, अभ्यासू आणि निर्णयक्षम नेतृत्व म्हणून ओळखले जात होते. जनतेच्या प्रश्नांबाबत त्यांची भूमिका नेहमी ठाम आणि स्पष्ट राहिली. प्रशासनावर पकड असलेला आणि कठीण निर्णय घेण्याची क्षमता असलेला नेता म्हणून त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली होती, असे खडसे यांनी नमूद केले. त्यांच्या निधनामुळे महाराष्ट्राने एक अनुभवी आणि प्रभावी लोकनेता गमावला असून ही हानी राज्यासाठी कधीही न भरून निघणारी आहे, असेही त्यांनी सांगितले.

## जनतेशी नाळ असणारे लोकनेते : आ.अग्रवाल

बारामती येथे आज सकाळी झालेल्या दुर्दैवी विमान अपघातात राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजितदादा पवार यांचा झालेला मृत्यू अतिशय धक्कादायक आहे. आजची सकाळ सर्वांनाच मोठ्या दुःखात लोटून गेली. राज्यातील प्रत्येकाच्या मनाला वेदना देणारी ही घटना आहे. अनेक वर्षे राज्याच्या राजकारणात राष्ट्रवादी काँग्रेसचे आणि राज्याचे नेतृत्व करणारे दादा अतिशय परखड आणि स्पष्टवक्ते होते. धुळे शहराचा आमदार म्हणून अनेकदा विकासकामांबाबत त्यांची भेट घेऊन चर्चा केली. यात प्रत्येक वेळी त्यांनी आमचे प्रश्न, समस्या समजून घेताना नेहमीच मदतीचा हात दिला. राज्यातील तळागाळातील जनतेशी मजबूत नाळ असणारे ते लोकनेते होते. त्यांच्या अकाली निधनाने राज्याची अपरिमित हानी झाली आहे. या दुर्दैवी घटनेने पवार कुटुंबीयांवर मोठा आघात झाला आहे. पवार कुटुंबीयांच्या आणि दादांवर प्रेम करणाऱ्या सर्वच समर्थकांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत, अशा शब्दात धुळे शहरचे आमदार अनुप अग्रवाल यांनी शोक भावना व्यक्त केली.

# मनमाड-इंदूर रेल्वे मार्गासाठी प्रतिचौरस मीटर मोबदला द्या

## अन्यथा भूसंपादनाला विरोध; रेल्वेमार्ग बाधित शेतकरी संघर्ष समितीच्यावतीने प्रांताधिकारी रोहन कुवर यांना निवेदन

वृत्तसंस्था । धुळे

**तालुक्यातून जाणाऱ्या प्रस्तावित मनमाड-इंदूर (बाळापूर ते पुरमेपाडा) रेल्वे मार्गासाठी सुरू असलेल्या भूसंपादन प्रक्रियेला तीव्र विरोध दर्शवित धुळे तालुक्यातील बाळापूर, वडजाई, पिंपरी, सावळदे, अवधान, लळींग, रानमळा, आर्वी व पुरमेपाडा या गावांतील बाधित शेतकऱ्यांनी संघटित भूमिका घेतली आहे. या पार्श्वभूमीवर आज (दि. २८) मनमाड-इंदूर (बाळापूर ते पुरमेपाडा) रेल्वेमार्गबाधित शेतकरी संघर्ष समितीच्यावतीने प्रांताधिकारी रोहन कुवर यांना निवेदन दिले.**

जोपर्यंत सर्व मागण्या पूर्ण होत नाहीत आणि शेतकऱ्यांना विश्वासात घेतले जात नाही, तोपर्यंत शासनाच्या कोणत्याही कर्मचाऱ्याला, प्रतिनिधीला अथवा भूसंपादन प्रक्रियेला सहकार्य केले जाणार नाही, असे या निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

**भूसंपादनास विरोध का?**

सध्या प्रस्तावित मोबदला हा बाजारभावाच्या तुलनेत अत्यंत अपुरा



असून, शासनाचा कोणताही कायदा शेतजमिनीचे योग्य व वास्तव मूल्यांकन करू शकत नाही, असा शेतकऱ्यांचा आरोप आहे. जमीन अधिग्रहणामुळे शेतकऱ्यांची शेती, उत्पन्नाचे मुख्य साधन आणि कुटुंबाचा उदरनिर्वाह धोक्यात येणार आहे. बागायती व सिंचन सुविधा असलेल्या सुपीक जमिनीचा मोठ्या प्रमाणावर नाश होणार असून, पर्यायी जमीन, पुनर्वसन किंवा रोजगाराबाबत कोणतीही ठोस व लेखी हमी देण्यात आलेली नाही. संबंधित शेतकरी व ग्रामसभेशी सविस्तर चर्चा व सहमती न घेता ही प्रक्रिया राबवली जात असल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला. यापूर्वी नरडाणा-बोरविहीर रेल्वेमार्गासाठी

(पान २ वर)

● प्रशासनाने जमिनीचा योग्य व न्याय्य मोबदला दिल्यास रेल्वेमार्गासाठी भूसंपादनास सहकार्य करण्याची तयारी असल्याचेही शेतकऱ्यांनी नमूद केले. शेतकऱ्यांच्या प्रमुख मागण्यांमध्ये जिल्हाधिकारी व प्रांताधिकारी तथा सक्षम प्राधिकारी यांनी लेखी स्वरूपात मोबदला जाहीर करावा, तसेच समृद्धी महामार्गाच्या धर्तीवर 'वन टाइम सेटलमेंट' पद्धतीने मोबदला देण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. केंद्र शासनाच्या २०१३ च्या भूसंपादन कायद्याची पूर्ण अंमलबजावणी करण्याचीही मागणी करण्यात आली आहे.

# ३० हजारांची लाच घेतांना दोन तलाठी जाळ्यात

प्रतिनिधी । जळगाव

**जिल्ह्यात लाचखोरीची प्रकरणे सातत्याने उघडकीस येत असताना, गिरणा नदीत पकडलेले वाळूने भरलेले ट्रॅक्टर सोडण्यासाठी सुमारे ३० हजाराची लाच स्वीकारताना एरंडोल तालुक्यातील दोन तलाठ्यांना रंगेहाथ पकडण्यात आले. ही कारवाई जळगाव येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने यशस्वी केली. या प्रकरणी दोघांविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल झाला आहे.**

नरेश भास्कर शिरूड (वय ४१), तलाठी सजा उत्राण अहिर हद्द, ता. एरंडोल) आणि शिवाजी एकनाथ घोलप (वय ४६), तलाठी सजा उत्राण गुजर हद्द, ता. एरंडोल), अशी वाळूचे ट्रॅक्टर सोडण्यासाठी सुमारे ३० हजाराची लाच स्वीकारल्याच्या आरोपावरून गुन्हा दाखल झालेल्या संशयितांची नावे आहे. दोघांच्या विरोधात जळगाव येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पोलीस निरीक्षक स्मिता नवघरे यांच्या तक्रारीवरून कासोदा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## संपादकीय

### प्रदूषण गंभीर समस्या...

प्रदूषण ही देशातली सध्या सगळ्यात गंभीर समस्या बनली आहे, पण त्याकडे सरकारचेही लक्ष नाही आणि जनतेचा आवाज कोणी ऐकत नाही, अशी परिस्थिती आहे. दावोस येथे झालेल्या एका परिषदेत आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या सल्लागार गीता गोपीनाथन यांनी तेथे जाहीर व्यासपीठावरून बोलताना, भारताने विदेशी गुंतवणूक आणण्याचे प्रस्ताव ठेवण्याच्या आधी आपल्या देशातील प्रदूषणाचे वातावरण ठीक करावे, असा जाहीर सल्ला दिला होता. आंतरराष्ट्रीय व्यासपीठावरून भारताला मिळालेला हा सल्ला देशासाठी अवमानकारकच मानला पाहिजे. देशातील प्रदूषणाची स्थिती खरोखरच भयानक आहे. स्वीस एयर क्वालिटी टेक्नॉलॉजी या संस्थेने सुमारे दीड वर्षापूर्वी म्हणजे २०२४ मध्ये जो एक अहवाल दिला होता, त्यात असे म्हटले होते की, जगातल्या सगळ्यात प्रदूषित २० शहरांपैकी १३ शहरे भारतात आहेत आणि जगातील सर्वात प्रदूषित राजधानी म्हणून दिल्लीचा उल्लेख त्यांनी केला होता. एकूण राष्ट्र म्हणून विचार केला तर भारत हा जगातला पाचवा सर्वात प्रदूषित देश आहे. या प्रदूषणाचे परिणाम इतके भयंकर आहेत की आज वर्षाला सरासरी किमान २० लाख लोकांचे त्यामुळे बळी जातात. याआधी लॅन्सेट प्लॅनेटरी हेल्थ या संस्थेने २००९ ते २०१९ अशा सलग दहा वर्षांचा भारतातील प्रदूषण बळींचा जो अभ्यास केला त्यात त्या कालावधीत दरवर्षी सरासरी १५ लाख लोक मरण पावले होते, असे नमूद करण्यात आले आहे. ही सगळी भयंकर आकडेवारी पाहिल्यानंतरही अजून आपल्याला आणि आपल्या सरकारला जाग येताना दिसत नाही. प्रदूषण ही सरकारने उपाययोजना करून सोडवण्याची बाब असते हेच बहुधा केंद्र सरकारच्या खिसगणतीत नाही. त्यांना याच्याशी काही देणे-घेणे आहे, असेही कधी दिसत नाही. मुळात पर्यावरण आणि प्रदूषण हे विषय केंद्र सरकारने आपल्यापासून दूर ठेवल्यासारखीच स्थिती आहे. विकासकामाच्या नावाखाली पर्यावरणाची सध्याची प्रचंड हानी सुरू आहे, त्याला खुद्द सरकार जबाबदार आहे. कोणत्याही प्रकल्पासाठी हजारो झाडे तोडली जाऊ लागली आहेत. खनिज उत्खनन करण्यासाठीसुद्धा पर्यावरणाच्या हानीकडे सर्रास दुर्लक्ष केले जात आहे. प्रदूषित हवेबरोबरच प्रदूषित पाणी ही आणखीन एक भीषण समस्या देशातील नागरिकांना भेडसावत आहे. नुकतेच इंदोरमध्ये दूषित पाणी प्यायल्याने किमान २० जणांचे बळी गेले आहेत. ज्या देशात हवा सुरक्षित नाही, पिण्यायोग्य पाणी नाही असा देश विकसित भारताच्या गप्पा कशा काय मारू शकतो, हा प्रश्न आंतरराष्ट्रीय पातळीवरून विचारला जाऊ लागला आहे. दिल्ली शहरात सध्या प्रदूषणाची जी स्थिती आहे ती पाहिल्यानंतर हे देशाच्या राजधानीचे शहर असू शकते काय,असाही प्रश्न उपस्थित होतो. सगळ्याच बाबतीत बनावटगिरी करण्याचा प्रकार सरकारी पातळीवरून सर्रास सुरू आहे, पण ज्या यंत्राद्वारे हवेची गुणवत्ता तपासली जाते. त्या यंत्राच्या भोवती टँकरद्वारे सतत पाण्याची फवारणी करून या गुणवत्तेच्या आकडेवारीतच गडबड करण्याचा अनोखा प्रयत्न दिल्ली सरकारने केला आहे. ती बाब आम आदमी पक्षाचे सौरभ भारद्वाज यांनी तेथील व्हिडिओद्वारे सगळ्यांच्या पुढे आणली. निदान हवा प्रदूषणासारख्या प्रकाराबाबत तरी सरकारने अशी बनवाबनवी करण्याची गरज नव्हती. आपल्या सरकारच्या काळात दिल्लीतील एयर क्वालिटी इंडेक्स सुधारला आहे हे दाखवण्याच्या नादात तेथे ही बनवेगिरी झाली. दिल्लीत एके ठिकाणी जो प्रचंड कचरा साठला होता तो हजारो टन कचरा तेथून उचलून दुसऱ्या भागात टाकला गेला आणि त्यामुळे तेथील पाण्याचा निचरा पूर्ण थांबला आणि एक मोठा निवासी भाग दूषित पाण्याने व्यापला गेल्याचा प्रकारही नुकताच उघड झाला आहे. हे सगळे संतापजनक आहे.

# पंधरा दिवसांत प्रश्न न सोडविल्यास कामबंद आंदोलन

## आशा स्वयंसेविकांचा इशारा; सीईओ, आरोग्य अधिकाऱ्यांचा केला निषेध

प्रतिनिधी । जळगाव

**जिल्ह्यातील आशा स्वयंसेविकांना जननी सुरक्षा योजनेच्या कामाचा २०२३ पासूनचा थकित मोबदला मिळावा, यासह विविध मागण्यांसाठी आशा स्वयंसेविकांतर्फे प्रजासत्ताक दिनी (दि.२६) जिल्हा परिषदेसमोर धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी कोणीही जबाबदार अधिकारी निवेदन स्वीकारण्यासाठी न थांबल्याने आंदोलनाकर्त्यांतर्फे नाराजी व्यक्त करत जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी आणि आरोग्य अधिकाऱ्यांचा निषेध करण्यात आला. दरम्यान, १५ दिवसात प्रश्न न सोडविल्यास बेमुदत कामबंद आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.**



### अशा आहेत मागण्या...

यावेळी, जिल्ह्यातील आशा स्वयंसेविकांना एनएचएमचे संचालक यांच्या आदेशानुसार जननी सुरक्षा योजनेच्या कामाचा २०२३ पासूनचा थकित मोबदला मिळावा, कुटुंब कल्याण आयुक्त तथा एनएचएम संचालकांच्या आदेशानुसार प्राथमिक आरोग्य केंद्र मुख्यालय असलेल्या आशा स्वयंसेविकांना आरोग्यवर्धिनीच्या कामाची तपासणी वैद्यकीय अधिकाऱ्यांनी करून या कामाचा मोबदला अदा करावा, वाघळी, तरवाडे, पातोंडा (चाळीसगाव), वरखेडी (पाचोरा) तसेच गिरड (भडगाव) या प्राथमिक आरोग्य केंद्रातील आशा सेविकांच्या व्हाऊचरला जिओ टॅग फोटो प्रिंट जोडणे बंद करून कामाचा मोबदला अदा करावा, आशा सेविकांना कोणत्याही स्वरूपाच्या रजा लागू नाहीत तरीही आशा सेविकांना बाहेरगावी जायचे असल्यास नियमबाह्य रजेचा अर्ज घेण्याची पद्धत बंद करावी, आदी मागण्या करण्यात आल्या.

### आंदोलनाचा दिला इशारा...

सकाळी दहा वाजेपासून दुपारी तीन वाजेपर्यंत जिल्हा परिषद समोर धरणे आंदोलन केले. परंतु कोणीही जबाबदार अधिकारी निवेदन स्वीकारण्यासाठी न थांबल्याने आंदोलनकर्त्यांनी नाराजी व्यक्त करत अधिकाऱ्यांच्या आडमुठेपणाचा निषेध व्यक्त केल्याची माहिती युनियनचे रामकृष्ण पाटील व कल्पना भोई यांनी दिली. प्रलंबित प्रश्न जिल्हा परिषदेने येत्या पंधरा दिवसांत न सोडविल्यास जिल्ह्यातील आशा स्वयंसेविका फेब्रुवारी महिन्यात बेमुदत कामबंद आंदोलन करतील आणि होणाऱ्या विपरीत परिणामास जिल्हा परिषद जबाबदार राहील, असा इशाराही रामकृष्ण पाटील यांनी यावेळी दिला.

आशा स्वयंसेविकांचे प्रश्न सोडवावेत, या मागणीसाठी आशा स्वयंसेविकांतर्फे प्रजासत्ताक दिनी जिल्हा परिषदसमोर धरणे आंदोलन करण्यात येईल, अशी नोटीस दि.१७ जानेवारी रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी आणि जिल्हा आरोग्य अधिकारी यांना देण्यात आली होती. तसेच विविध विषयांवर चर्चा करून प्रश्न सोडविण्याची विनंती करण्यात आली होती. परंतु, या विनंतीकडे जिल्हा परिषद प्रशासनाने दुर्लक्ष केल्याने नाईलाजास्तव प्रजासत्ताक दिनी आंदोलन करण्यात आल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांतर्फे करण्यात आला. धरणे आंदोलनात कल्पना भोई, सुनंदा पाटील, सुनंदा हडपे, वंदना पाटील, भारती नेमाडे, नम्रता पाटील, रविशा मोरे, उषा मोरे, भारती तायडे, आशा पोहेकर, भारती चौधरी, संगीता देवरे यांच्यासह तीनशेपेक्षा जास्त आशा सेविका सहभागी झाल्या होत्या.

## दहावी-बारावीच्या परीक्षेवर राहणार ड्रोनची नजर

प्रतिनिधी । जळगाव

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या इयत्ता १० वी व १२ वीच्या परीक्षांच्या पार्श्वभूमीवर जळगाव जिल्ह्यात 'कॉपीमुक्त अभियान' प्रभावीपणे राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी ड्रोन कॅमेरे, लाईव्ह स्ट्रीमिंग, भरारी पथके व कडक पोलिस बंदोबस्त यांचा वापर करण्यात येणार आहे.**

राज्याचे मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या व्हिडिओ कॉन्फरन्सिंगनंतर जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा दक्षता समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीत परीक्षेच्या सुरळीत व पारदर्शक आयोजनाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी रोहन घुगे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल, पोलीस अधीक्षक महेश्वर रेड्डी, सदस्य सचिव शिक्षणाधिकारी कल्पना चव्हाण यांच्यासह महावितरण आणि जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्रतिनिधी उपस्थित होते.

### असे आहे परीक्षांचे वेळापत्रक, परीक्षार्थींची संख्या

इयत्ता १२ वीची परीक्षा १० फेब्रुवारी ते १८ मार्चदरम्यान तर इयत्ता १० वीची परीक्षा २० फेब्रुवारी ते १८ मार्च या कालावधीत होणार आहे. जळगाव जिल्ह्यात इयत्ता १० वीच्या परीक्षेसाठी १४७ परीक्षा केंद्रांवर ५९ हजार ४२० विद्यार्थी प्रविष्ट झाले असून, त्यामध्ये ३३ हजार ६५३ मुले व २५ हजार ७६७ मुली आहेत. तर इयत्ता १२ वीच्या परीक्षेसाठी ८२ परीक्षा केंद्रांवर एकूण ४८ हजार २३२ विद्यार्थी प्रविष्ट झाले आहेत. त्यामध्ये विज्ञान शाखेचे २६ हजार ८८४, कला शाखेचे १५ हजार ५१४, वाणिज्य शाखेचे ४ हजार ८११ विद्यार्थी असून, व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी ९७८ तर आयटीआय अभ्यासक्रमासाठी ४५ विद्यार्थी प्रविष्ट झाले आहेत.

## दुग्धजन्य खाद्य पदार्थ महोत्सव उत्साहात

प्रतिनिधी । जळगाव

प्राणीशास्त्र विभागातर्फे आयोजित दुग्धजन्य खाद्य पदार्थ महोत्सव उत्साहात पार पडला. या महोत्सवात विद्यार्थ्यांनी गुलाबजाम, फ्लेवर्ड मिल्क, मिल्क केक, मसाले ताक, मठ्ठा, दही पुरी अशाप्रकारचे विविध दुग्धजन्य खाद्यपदार्थांचे प्रदर्शन व सादरीकरण केले.

या उपक्रमासाठी प्राणीशास्त्र विभागाचे प्रा.डॉ.नूतन राठोड, प्रा.एम.पी.राठोड, डॉ.नम्रता महाजन, प्रा. देवेश्री सोनवणे, डॉ. धनश्री चौधरी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विज्ञान शाखेचे उपप्राचार्य डॉ. मनोजकुमार चोपडा यांचे यावेळी मार्गदर्शन लाभले.

## मणियार विधी महाविद्यालयाच्या हिवाळी शिबिराचा उत्साहात समारोप

प्रतिनिधी । जळगाव

**येथील एस.एस. मणियार विधी महाविद्यालयातर्फे शिरसोली येथील बारी समाज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आयोजित राष्ट्रीय सेवा योजनेचे सात दिवसीय हिवाळी शिबिराचा समारोप उत्साहात पार पडला.**

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.बी.युवाकुमार रेड्डी हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय सेवा योजना जिल्हाध्यक्ष डॉ.राजू गवारे, बारी समाज संस्थेचे अध्यक्ष निलेश खलसे, मुख्याध्यापक गोपाल बारी, एनएसएस कार्यक्रम अधिकारी प्रा.गणपत धुमाळे आदी उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. गवारे यांनी शिबिरादरम्यान राबवलेल्या उपक्रमाचे कौतुक करून विद्यार्थ्यांवर होणाऱ्या मूल्यात्मक संस्काराची जाणीव करून दिली. डॉ.रेड्डी यांनी, अध्यक्षीय समारोप करताना राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांचे कौतुक करून मार्गदर्शन केले. तत्पूर्वी कार्यक्रमाधिकारी प्रा. धुमाळे यांनी प्रास्ताविकात सात दिवसात राबवलेल्या विविध उपक्रमाचा आढावा मांडला. तसेच कमलेश सोनवणे, अंजली आंदोरे, हेमलता महाजन, गौरव निमकर्डे या स्वयंसेवकांनी आपले मनोगत व्यक्त केले.

## वादळी पावसाचा तडाखा, जिल्ह्यात २१ हजारांपेक्षा अधिक हेक्टरचे नुकसान

प्रतिनिधी । जळगाव

जिल्ह्यात मंगळवारी दुपारी झालेल्या गारपिटीसह वादळी पावसामुळे १० तालुक्यांतील २१ हजारांपेक्षा अधिक हेक्टरवरील केळी, मका, गहू, हरभरा, ज्वारी आणि इतर पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. नैसर्गिक आपत्तीच्या या तडाख्याने ४५५ गावांमधील २७ हजारांपेक्षा अधिक शेतकरी बाधित झाल्याची नोंद कृषी विभागाने घेतली आहे.

राज्यात अचानक पावसाळी स्वरूपाचे वातावरण निर्माण झाल्याने किमान तापमानात लक्षणीय वाढ झाली असून, त्यामुळे उकाडाही वाढल्याचे जाणवत आहे. मध्य महाराष्ट्र आणि उत्तर महाराष्ट्रातील अनेक भागांत ही तापमानवाढ अधिक तीव्रतेने आहे. जळगाव जिल्ह्यातही मंगळवारी सकाळपासूनच विविध



ठिकाणी ढगाळ हवामान राहिल्याने थंडीचा प्रभाव कमी झाला होता. दुपारनंतर अनेक भागांत वादळी वाऱ्यासह पावसाने हजेरी लावली. काही ठिकाणी बोरांच्या आकाराची गारपीट झाली. सध्या शेतांमध्ये गहू, हरभरा, मका तसेच रब्बी ज्वारीसारखी पिके काढणीच्या टप्प्यात आहेत. अशा वेळी अचानक झालेली गारपीट आणि अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. पावसाचे प्रमाण आणखी वाढल्यास उभ्या पिकांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता असल्याने शेतकरी वर्ग काळजीत दिसून येत आहे.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मंगळवारी जिल्ह्यातील जळगावसह भुसावळ, यावल, रावेर, मुक्ताईनगर, चोपडा, एरंडोल, धरणगाव, पारोळा आणि चाळीसगाव, या तालुक्यातील शेतकऱ्यांना जास्तकरून गारपिटीसह वादळी पावसाचा फटका बसला. पैकी एरंडोल तालुक्यात सर्वाधिक ५३९८ हेक्टर, त्यानंतर मुक्ताईनगर तालुक्यात ४६५८ हेक्टर, चोपडा तालुक्यात ३७२८ हेक्टर, पारोळा तालुक्यात २९४५ हेक्टर, रावेर तालुक्यात १६७७ हेक्टर, धरणगाव तालुक्यात १२०७ हेक्टर, जळगाव तालुक्यात ८३७ हेक्टर, भुसावळ तालुक्यात ७३५ हेक्टर, यावल तालुक्यात ५९१ हेक्टर आणि चाळीसगाव तालुक्यात ३१.३० हेक्टर, असे एकूण २१ हजार ८०९ हेक्टरवरील विविध पिकांचे नुकसान झाले आहे.

## पी.जी. महाविद्यालयात पार पडले सेमिनार

प्रतिनिधी । जळगाव

केसी.ई. सोसायटी संचलित पी.जी. महाविद्यालयात पी.जी. टेक्नोलॉजीया या उपक्रमात एक दिवसीय सेमिनार व स्पर्धा परीक्षा घेण्यात आली. यावेळी प्राचार्य डॉ.के.बी. महाजन, डॉ.व्ही. एस. झोपे, डॉ.आर.एम. पाटील, डॉ.एस.आर. चौधरी, उल्हास पाटील व प्रा.जयश्री जाधव आदी उपस्थित होते. यावेळी डॉ.के.बी. महाजन यांनी महाविद्यालयातील सर्वोत्तम क्रियाकलाप 'पी.जी.टेक्नोलॉजीया' या बद्दल माहिती दिली. डॉ.आर. एम. पाटील यांनी 'बौद्धिक संपदा अधिकार' यावर प्रकाश टाकला.

## भारत विकास परिषदेतर्फे १ मार्च रोजी महादिव्यांग शिबीर

### कृत्रिम मॉड्युलर पायाचे होणार मोफत वितरण : विनय खटावकर यांची माहिती

प्रतिनिधी । जळगाव

**भारत विकास परिषद जळगाव शाखा व भारत विकास परिषदेचे पुणे येथील दिव्यांग केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने १ मार्च रोजी ५०० दिव्यांग व्यक्तींना शिबिरात कृत्रिम मॉड्युलर पायाचे मोफत वितरण करण्यात येणार असल्याची माहिती विश्वस्त व दिव्यांग केंद्र प्रमुख विनय खटावकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.**

यावेळी प्रकल्प प्रमुख तुषार तोतला, विशाल चोरडिया, जळगाव शाखेचे सचिव डॉ. अनुपम दंडगव्हाळ, कोषाध्यक्ष अनिरुद्ध कोटस्थाने उपस्थित होते.

पुढे बोलतांना श्री. खटावकर यांनी, महाराष्ट्रात कायमस्वरूपी पुणे येथे भारत विकास परिषदेच्या दिव्यांग केंद्रातून गेल्या २५ वर्षांपासून अखंडपणे कार्य सुरू आहे. या केंद्राद्वारे दरवर्षी सुमारे ५ हजार दिव्यांगांना मोफत कृत्रिम पाय, हात व कॅलिपर बसविण्यात येतात. गेल्या वर्षी एकाच शिबिरात ८९२ दिव्यांगांना कृत्रिम पाय बसवून जागतिक विक्रम होऊन त्याची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉडमध्ये झाली असल्याचे त्यांनी सांगितले. जळगाव येथील या शिबिरासाठी पुण्याच्या रॉकेट सॉफ्टवेअर कंपनीने सीएसआर अंतर्गत आर्थिक सहकार्य केलेले आहे. या आधुनिक कृत्रिम मॉड्युलर पायाची ५० हजारांपेक्षा जास्त किंमत असून ते मोफत स्वरूपात देण्यात येणार आहे. हे वजनाला अत्यंत हलके असून दिव्यांग व्यक्ती चालणे, पळणे, पोहणे, उडी मारणे, वाहन चालवणे, शेती काम करणे इत्यादी प्रकारच्या दैनंदिन क्रिया करू शकतात, असेही श्री. खटावकर यांनी यावेळी सांगितले. आभार प्रकल्प समन्वयक चिन्मय खटावकर यांनी मानले. याप्रसंगी भारत विकास परिषदेचे उपाध्यक्ष डॉ.विकास चौधरी, प्रसन्न मांडे, उल्हास सुतार, भूषण गुरव, राजी नायर उपस्थित होते.

### या ठिकाणी करता येईल नाव नोंदणी...

या शिबिरासाठी पूर्व नोंदणी करणे गरजेचे असून त्यासाठी चौधरी (८३०८४७८६२४), नायर (७५८८४७८६२४) किंवा संपर्क फाउंडेशन ४२, गांधीनगर जिल्हा पेठ कांताई सभागृहाजवळ, जळगाव येथे संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

## गंभीर आजारांचे तत्काळ, अचूक निदान स्थानिक पातळीवरच होणार

### पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी व्यक्त केला विश्वास; १२८ स्लाइस सीटी स्कॅन मशीनचे लोकार्पण

प्रतिनिधी । जळगाव

**शहरासह जिल्ह्यातील रुग्णांना आता गंभीर आजारांचे तात्काळ व अचूक निदान स्थानिक पातळीवरच होणार आहे. आरोग्यसेवेत जळगावने आणखी एक ऐतिहासिक टप्पा गाठला आहे. सामान्य कुटुंबातील रुग्णाला वेळेत निदान होऊन जीव वाचावा, हाच आमचा खरा उद्देश आहे. सुरू झालेले १२८ स्लाइस सीटी स्कॅन मशीन म्हणजे जळगावच्या आरोग्यसेवेसाठी क्रांतिकारी पाऊल असून अपघात, हृदयरोग, मेंदूविकार यासारख्या गंभीर आजारांमध्ये 'गोल्डन अवर' महत्त्वाचा असतो. ही सुविधा त्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त ठरणार असल्याचे प्रतिपादन राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी केले.**



शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत सन २०२४-२५ मधील मंजूर निधीतून अत्याधुनिक टर्न-की प्रकल्पातील १२८ स्लाइस सीटी स्कॅन मशीनचे लोकार्पण पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्याहस्ते प्रजासत्ताकदिनी (दि.२६) करण्यात आले. याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी रोहन घुगे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल, अधिष्ठाता डॉ.गिरीश ठाकूर, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.स्वप्निल सांगळे उपस्थित होते.

पुढे बोलतांना ना.पाटील यांनी, शासन निर्णयानुसार पात्र रुग्णांना ही सेवा मोफत तर इतर रुग्णांना नाममात्र शुल्कात उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यामुळे खासगी रुग्णालयांवरील खर्चाचा मोठा आर्थिक बोजा सर्वसामान्यांवर येणार नाही, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाला वैद्यकीय महाविद्यालयातील डॉक्टर, कर्मचारी, वैद्यकीय शाखेचे विद्यार्थी उपस्थित होते. या अत्याधुनिक मशीनद्वारे मेंदूचे सीटी स्कॅन, शरीरातील विविध अवयवांचे प्लेन सीटी स्कॅन, कॉन्ट्रास्टसह सीटी स्कॅन, अब्डॉमेन व पेल्व्हिस संयुक्त तपासणी, बोन डेन्सिटोमेट्री, कार्डिएक सीटी, व्हॅस्क्युलर तसेच इतर विशेष तपासण्या कमी वेळेत व अधिक अचूकतेने करता येणार आहेत. या सुविधेमुळे अपघातग्रस्त रुग्ण, हृदयरुग्ण, मेंदूविकारग्रस्त तसेच गंभीर आजारांच्या रुग्णांचे तातडीने निदान होऊन उपचार सुरू करणे शक्य होणार आहे.

## पान १ वरुन

### मनमाड-इंदूर रेल्वे......

झालेल्या भूसंपादनावेळीही बाजारभावाच्या तुलनेत अत्यंत कवडीमोल मोबदला देण्यात आला होता. अनेक शेतकऱ्यांच्या शेतजमिनींचे तीन तुकडे झाले असून, रेल्वेमार्ग शेतजमिनीपेक्षा २० ते २५ फूट उंचीवर गेल्याने गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत. एका बाजूने दुसऱ्या बाजूला शेती करण्यासाठी जाणे कठीण झाले आहे. रेल्वेमार्गासाठी केलेल्या मुरूम भरावामुळे पावसाचे पाणी शेतात साचून पिकांची मोठ्या प्रमाणावर नासाडी होत आहे. तसेच शेतातील सुपीक माती वाहून जात असून, शेतजमीन नापीक होत असल्याच्या तक्रारीही शेतकऱ्यांनी केल्या.

बाळापूर, पिंपरी व अवधान ही गावे महापालिकेच्या हद्दीत असून ती राष्ट्रीय महामार्ग क्रमांक तीन व सहा लगत आहेत. उर्वरित काही गावेही राष्ट्रीय महामार्ग क्रमांक तीन लगतची असल्याने त्यानुसार मोबदला देण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली. २०१४ मध्ये धुळे महापालिका हद्दीतील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक तीनसाठी बाधित शेतकऱ्यांना प्रतिचौरस मीटर आठ हजार रुपये मोबदला देण्यात आला होता. त्याच धर्तीवर सर्व बाधित शेतकऱ्यांना मोबदला देण्यात यावा. ज्या शेतजमिनींचे तीन तुकडे झाले आहेत, त्या जमिनींना पूर्णपणे बाजारभावानुसार मोबदला देण्यात यावा. याशिवाय प्रकल्पग्रस्त शेतकरी कुटुंबांना प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र देण्यात यावे. तसेच कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीस शासकीय नोकरी देण्यात यावी, अशा मागण्यांचाही निवेदनात समावेश आहे. या निवेदनावेळी मनमाड-इंदूर (बाळापूर ते पुरमेपाडा) रेल्वेमार्गबाधित शेतकरी संघर्ष समितीचे जयेश चौधरी, डॉ. प्रशांत साळुंखे, डॉ. योगेश गवळी, सुधाकर पाटील यांच्यासह मोठ्या संख्येने बाधित शेतकरी उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक - सागर काशिनाथ ओतारी (मोबा.- ९९७००५३०६६) व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
✻ कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी (✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७-२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

# पोलीस पाटलांनी आपले कर्तव्य चोखपणे बजवावे!

## ● पालकमंत्री जयकुमार रावल यांचे प्रतिपादन; पोलीस पाटील मार्गदर्शिका पुस्तिकीचे अनावरण

प्रतिनिधी । धुळे

**पोलीस पाटील हा ग्रामीण भागातील पोलीस यंत्रणेचा कणा असून कायदा व सुव्यवस्था राखण्यात त्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे पोलीस पाटलांनी आपले कर्तव्य चोखपणे बजवावे, असे प्रतिपादन राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी केले.**



पोलीस विभागामार्फत आयोजित जिल्हास्तरीय पोलीस पाटील मेळावा व पोलीस पाटील मार्गदर्शिका पुस्तिकीचे अनावरण आज हिरे भवन येथे झाला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी आ. अनुप अग्रवाल, राघवेंद्र पाटील, डॉ. सुभाष भामरे, पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे, उपविभागीय पोलीस अधिकारी ज्ञानेश्वर जाधव आदी उपस्थित होते.

पालकमंत्री रावल म्हणाले की, एखादी घटना घडल्यानंतर माहिती देण्यापेक्षा घटना घडूच नये, यासाठी प्रतिबंधात्मक भूमिका बजावण्याची क्षमता पोलीस पाटलांकडे आहे. समाजात पोलीस पाटलांकडे प्रतिष्ठित व्यक्तिमत्त्व म्हणून पाहिले जाते. अलीकडच्या काळात सुशिक्षित महिला व पुरुष, पदवीधर तसेच पदव्युत्तर शिक्षण घेतलेले नागरिक पोलीस पाटील म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या कामकाजाला योग्य दिशा व स्पष्टता मिळावी म्हणून मार्गदर्शिका उपयुक्त ठरेल. ब्रिटिशकालीन कायदे लोकांवर नियंत्रण ठेवण्यासाठी तयार करण्यात आले होते. हे कायदे रद्द करून भारतीय न्याय संहिता २०२३, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ आणि भारतीय साक्ष अधिनियम लागू करण्यात आले आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी व गृहमंत्री अमित शहा यांच्या नेतृत्वाखाली हे ऐतिहासिक कायदे अस्तित्वात आले असून, त्यांची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यामध्ये पोलीस पाटलांची भूमिका महत्त्वाची आहे, असे त्यांनी नमूद केले.

गावातील घडामोडींवर लक्ष ठेवणे, सतर्क राहणे, कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे आणि शांतता प्रस्थापित करणे ही जबाबदारी पोलीस पाटलांनी पार पाडावी. आ. श्री. पाटील म्हणाले की, ग्रामीण भागातील नागरिकांच्या दैनंदिन जीवनात सरपंच, ग्रामसेवक व रोजगार सेवकांबरोबरच पोलीस पाटील हा अत्यंत महत्त्वाचा दुवा आहे,असेही त्यांनी सांगितले. आ. अग्रवाल म्हणाले की, ग्रामीण भागात पोलीस पाटील ही व्यवस्था प्रभावी आहे. पोलीस पाटील हे पोलीस विभागाचे स्लिपरसेल म्हणून काम करतात,असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी डॉ. भामरे यांनी मनोगत व्यक्त केले. पोलीस अधीक्षक श्री.धिवरे म्हणाले की, पालकमंत्री जयकुमार रावल यांच्या सूचनेनुसार जिल्हास्तरीय पोलीस पाटील मेळाव्याचे आयोजन करण्यात आले.

# श्री मुक्तेश्वर महादेव मंदिर लोकार्पण सोहळा

प्रतिनिधी । धुळे

**शहरातील कैलासनगर स्मशानभूमी परिसरात उभारण्यात आलेल्या श्री मुक्तेश्वर महादेव मंदिराच्या लोकार्पण व महाप्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त २५ जानेवारीला सर्वसमावेशक बैठक पार पडली. या बैठकीत मिल परिसराची उत्सव समिती सर्वानुमते निवडण्यात आली.**

अध्यक्षस्थानी महामंडलेश्वर पार्वती जोगी होत्या. उत्सव समितीत संस्थापक अध्यक्ष मनोज गर्दे, अध्यक्ष म्हणून नगरसेवक अमोल मासुळे, उपाध्यक्षपदी नगरसेवक निलेश नेमाणे, गौरव उगले, कार्याध्यक्ष गोरख पाटील, कोषाध्यक्ष रोहित परदेशी, सचिव प्रकाश झणके तर सहसचिव म्हणून जितू इखे यांची निवड झाली. सल्लागार मंडळात नगरसेवक संजय जाधव, सुनील बैसाणे, धीरज कलंत्री, तुषार नवले, दिनेश पोतदार, विलास ढवळे, विकास बाबर, शशी मोगलाईकर, सुनिल पाटील, सुनिल चौधरी, राम सोनवणे, किशोर सरगर, अनिल जाधव, दिनेश गायकवाड, राहुल खैरनार, गोकुळ झाल्टे, राजू सुपनर, श्याम देवकाते, बंडू पवार, आनंद पाटील, विजय मराठे यांचा समावेश आहे. नियोजन प्रमुखपदी राजेंद्र पाचपुते, प्रा.घनश्याम महाजन, हरिदास सोनवणे, छोटू सोनार, संजय परदेशी, चेतन परदेशी, सिद्धार्थ जोंधळे, कैलास पाचंगे, रोहित गर्दे, सुरेश माने, सतीश उघडे, प्रफुल्ल सोनार, नरेश मोहिते, सुनील कणके, भोला परदेशी, किसन राजपूत, जयेश पाटील यांची निवड झाली. तसेच प्रसिद्धीप्रमुखपदी म्हणून गौतम पगारे व राकेश गाळणकर यांच्याकडे जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

## थोडक्यात

### विक्रेत्याकडे ६६ हजारांची घरफोडी



**धुळे ।** शहरातील नवाब हमीद कुरेशी (रा. अरिहंत मंगल कार्यालय) या बकरी विक्रेत्याकडे घरफोडी होवून ६६ हजारांचा मुद्देमाल लांबविला आहे. दि.१९ ते २० जानेवारीदरम्यान रात्रीच्या वेळी घराच्या पुढील दरवाजाचे कुलूप तोडून चोरट्यांनी ६६ हजारांचा मुद्देमाल लंपास केला आहे. यात सोने-चांदीचे दागिने, रोकड यांचा समावेश आहे. याबाबत चाळीसगावरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### तलवारीने एकावर जीवघेणा हल्ला

**धुळे ।** शिंदखेडा तालुक्यातील भडणे येथील विवेकांनद सहकारी दूध संस्थेच्या निवडणुकीत विरोधातील पॅनलमध्ये उभा राहुन निवडुन आल्याच्या रागातून एकावर तलवारीने प्राणघातक हल्ला करण्यात आला. याप्रकरणी पाच जणांवर गुन्हा नोंद झाला आहे. याबाबत मनोज वसंत निकुम (वय ३५) यांनी शिंदखेडा पोलिसात फिर्याद दिली आहे. त्यानुसार, वरील कारणावरून तानाजी वामन देसले, गिरीश वामन देसले, संभाजी वामन देसले, संजय भगवान देसले, किरण संजय देसले यांनी काल दि. २६ रोजी दुपारी बारा वाजेच्या सुमारास एकत्र आले. तानाजी देसले याने जिवे मारण्याच्या उद्देशाने तलवारीने फिर्यादीच्या डोक्यावर वार केला. तो चुकवित असतांना तलवार ही फिर्यादीच्या डाव्या बाजुच्या कमरेखालील भागावर मारून जखमी केले.

# प्राध्यापकांनी जगातील नवनवीन ज्ञान कौशल्य विद्यार्थ्यांना प्रदान करावे : डॉ.दिलीप पाटील



प्रतिनिधी । धुळे

**जीवनासाठी लागणाऱ्या सर्व मूलभूत बाबींचे ज्ञान विद्यार्थ्यांना असणे गरजेचे आहे. आजच्या जगातील प्रगत ज्ञानाची गंगोत्री विद्यार्थ्यांपर्यंत जावी, याकरिता प्राध्यापकांनी आधुनिक तंत्रज्ञानाचे कौशल्य आत्मसात करावे आणि जगातील नवनवीन ज्ञान कौशल्य विद्यार्थ्यांना प्रदान करावे, असे प्रतिपादन विद्यावर्धिनी गव्हर्निंग कौन्सिलचे सदस्य डॉ.दिलीप पाटील यांनी केले.**

विद्यावर्धिनी महाविद्यालयात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या पीएम उषा योजनेंतर्गत महाविद्यालयातील गुणवत्ता सुधार कक्षातर्फे शैक्षणिक भागधारकांसाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण -२०२० या विषयावरील कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी डॉ.पाटील बोलत होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थेचे सदस्य जगदीश गायकवाड यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर प्राचार्य डॉ.जगदीश पाटील, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ.शिवाजी पाटील, डॉ.ऋषिकेश चित्तम, डॉ.सुरेश शेलार, डॉ.भरत जावळेकर, उपप्राचार्य डॉ.योगेश पाटील, पंजाबराव व्यास व डॉ. राजवीरेंद्रसिंग उपस्थित होते.

समन्वयक गावित म्हणाले की, प्राध्यापकांनी आधुनिक प्रगतज्ञान विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवून बदलत्या जगाशी स्पर्धा करण्यासाठी विद्यार्थ्यांना सक्षम करावे. त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानाबरोबरच व्यावसायिक कौशल्य निर्माण करण्यासाठी प्रयत्न करावे, असे यावेळी जगदीश गायकवाड म्हणाले. डॉ. राजेश जावळेकर यांनी सांगितले की, आज ज्ञान विज्ञानाचा चौफेर विकास झाला असला तरी आजही बुद्धिमत्तेची वाणवा आहे. जगात होणारे हे बदल अनिवार्य असून कौशल्य व कार्यक्षमता निर्मितीसाठी अनेक बाबींमध्ये प्राविण्य निर्माण करणे गरजेचे आहे. यापुढे विद्यार्थ्यांचे यशाचे किंवा ज्ञानाचे निकष हे गुण असणार नाहीत. आजच्या सर्व शाखांच्या विद्यार्थ्यांना सर्व विषयांचे किमान ज्ञान असणे गरजेचे आहे. शिक्षणाचा उपयोजनात्मक वापर आणि विद्यार्थ्यांमध्ये सूचनात्मक निर्मितीची क्षमता वाढवणे हा राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा मुख्य उद्देश आहे, असेही प्राचार्य डॉ. जगदीश पाटील यांनी सांगितले.

### अक्षय सातपुतेंना उत्कृष्ट डाटा एंट्री ऑपरेटर पुरस्कार

**अमळनेर ।** जिल्हा प्रशासनाच्यावतीने देण्यात येणारा सन २०२६ चा उत्कृष्ट डाटा एंट्री ऑपरेटर तांत्रिक सहाय्यक हा मानाचा पुरस्कार अमळनेर तहसील कार्यालयातील अक्षय दिलीप सातपुते यांना प्रदान करण्यात आला. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित राष्ट्रीय मतदार दिन विशेष कार्यक्रमात जिल्हाधिकारी रोहन घुगे यांच्या हस्ते हा पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. अक्षय सातपुते हे मागील १० वर्षांपासून तहसील कार्यालय, अमळनेर येथील निवडणूक शाखेत कार्यरत आहेत.

# कर्मचाऱ्यांचा संप, बँकिंग व्यवहारांवर मोठा परिणाम

प्रतिनिधी । धुळे

**पाच दिवसांचा कार्य आठवडा लागू करण्याच्या प्रमुख मागणीसाठी देशभरातील सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे कर्मचारी व अधिकारी आज देशव्यापी संपावर गेल्याने बँकिंग व्यवहारांवर मोठा परिणाम झाला. धुळे शहरातही या संपाला प्रतिसाद लाभला. संपामुळे बँकिंग व्यवहार पूर्णतः ठप्प झाले होते.**

जिल्हा परिषदेसमोरील स्टेट बँक ऑफ इंडिया शाखेसमोर बँक कर्मचाऱ्यांनी एकत्र येत घोषणाबाजी करत निदर्शने केली. या संपात देशातील एकूण ९ बँक कर्मचारी संघटनांचा सहभाग आहे. यावेळी आंदोलक कर्मचाऱ्यांनी सांगितले की, यापूर्वी पाच दिवसांचा कार्यआठवडा लागू करण्याबाबत चर्चा होऊन तत्त्वतः सहमती झाली होती. मात्र, अद्याप अंतिम निर्णय न झाल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. संघटनांच्या मते, पाच दिवसांचा आठवडा लागू झाला तरी दररोज अधिक वेळ काम करण्यास कर्मचारी तयार असून त्यामुळे बँकिंग सेवेवर कोणताही परिणाम होणार नाही. आरबीआय, एलआयसी तसेच इतर केंद्र सरकारच्या अनेक विभागांमध्ये पाच दिवसांचा कार्यआठवडा लागू आहे. मात्र, बँक कर्मचाऱ्यांना त्यापासून वंचित ठेवले जात असून हा अन्याय असल्याचे संघटनांचे म्हणणे आहे. सरकारने तात्काळ पाच दिवसांचा कार्यआठवडा लागू करावा. तसेच प्रलंबित मागण्यांवर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. आंदोलनात युएफबीयुचे अध्यक्ष संजय गिरासे, रविप्रसाद पांडे, ज्ञानेश्वर ठाकुर, तेजपाल सोनवणे, अमित सोनवणे, राजेंद्र चव्हाण आदींसह बँके कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# पारोळा रोडवरील शेतकरी पुतळ्याजवळ बस थांबा मंजूर

प्रतिनिधी । धुळे

**जळगाव, अमळनेरच्या दिशेने येणाऱ्या व धुळे शहरातून त्या दिशेने जाणाऱ्या राज्य परिवहन महामंडळाच्या सर्व बसेसला शहरातील पारोळा रोडवरील रामचंद्रनगर परिसरातील शेतकरी पुतळ्याजवळ बस थांबा मंजूर झाला आहे. यामुळे पारोळा रोडवरील रामचंद्रनगरसह परिसरातील प्रवाशांची मोठी सोय झाल्याची माहिती आ.अनुप अग्रवाल यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली.**

शहरातील पारोळा रोडवरील रामचंद्रनगर परिसरातील नागरिकांनी याबाबत आमदार अग्रवाल यांना निवेदन देत पारोळा रोडवरील शेतकरी पुतळ्याजवळ जळगाव, अमळनेरकडे जाणाऱ्या व तिकडून धुळे शहरात येणाऱ्या राज्य परिवहन महामंडळाच्या सर्व बसेस यांना थांबा मिळावा, अशी मागणी केली होती. त्यानुसार आमदार अग्रवाल यांनी राज्य परिवहन महामंडळाच्या विभाग नियंत्रकांना परिसरातील नागरिकांच्या सोयीसाठी पारोळा रोडवरील रामचंद्रनगर लगतच्या शेतकरी पुतळ्याजवळ बस थांबा देण्याबाबत पत्र दिले होते. शहराचा वाढता विस्तार लक्षात घेता व वाढत्या प्रवाशांच्या मागणीचा विचार करता तातडीने कार्यवाही करावी, अशी सूचनाही केली होती. आ.अग्रवाल यांच्या पत्रानुसार राज्य परिवहन महामंडळाच्या विभाग नियंत्रकांनी रस्ता सुरक्षा समितीकडे बस थांबा मंजुरीबाबत पाठपुरावा सुरू केला. त्यात दिरंगाई होत असल्याने आ.अग्रवाल यांनी २२ जानेवारीला झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत पालकमंत्री जयकुमार रावल यांच्याकडे याबाबत मागणी केली होती. त्यावर पालकमंत्री रावल यांनी बैठकीतच राज्य परिवहन महामंडळाच्या विभाग नियंत्रकांना आमदार अग्रवाल यांच्या मागणीनुसार पारोळा रोडवरील शेतकरी पुतळ्याजवळ धुळे शहरात येणाऱ्या व जाणाऱ्या सर्व बसेस यांना तातडीने थांबा मंजूर करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार एसटी महामंडळातर्फे तातडीने बस थांबा मंजूर केला असून, तशा सूचना सर्व बसचालक-वाहकांना देण्यात आल्याची माहिती विभाग नियंत्रकांनी आ.अग्रवाल यांना पत्राद्वारे दिली आहे.

# माळी हायस्कूलची शैक्षणिक सहल

प्रतिनिधी । शिरपूर


**शिरपूर- वरवाडे नगरपरिषद संचलित, शहरातील पांडू बापू माळी म्युनिसिपल हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना पीएम श्री योजनेंतर्गत मोफत शैक्षणिक सहल व क्षेत्रभेटीचे आयोजन करण्यात आले होते. सलग तीन दिवस ७५० विद्यार्थ्यांनी सहलीचा आनंद घेतला.**

यावेळी विद्यार्थ्यांनी क्षेत्रभेटीतून ग्रामीण संस्कृती व मधमाश्यांचा ठेवा यांची माहिती घेतली. झोडगे येथील हेमाडपंथी शिवमंदिर, चांदवड येथील ऐतिहासिक रेणुका देवी मंदिर, पिंपळगाव बसवंत येथील हनी गार्डन व मनोरंजन गार्डन या ठिकाणी सहल नेण्यात आली. सहलीच्या पहिल्या दिवशी शिरपूर गटशिक्षणाधिकारी डॉ. नीता सोनवणे यांनी शुभेच्छा दिल्या.

# दोंडाईचा नगराध्यक्ष नयनकुमार रावल यांना मातृशोक

प्रतिनिधी । दोंडाईचा

**सारंगखेडा येथील ऐतिहासिक रावल संस्थानच्या राजमाता राणीसाहेब दिलहरकुवरबा छत्रसिंह रावल (वय ९५) यांचे दि. २७ जानेवारी निधन झाले.**



राजमाता दिलहरकुवरबा रावल या स्व. नानासाहेब छत्रसिंह नागोसिंह रावल यांच्या पत्नी आणि दोंडाईचा नगराध्यक्ष नयनकुवर जितेंद्रसिंह रावल, बिनाकुंवर बापूसाहेब रावल, जयराजकुवर प्रदीपसिंह सिसोदिया, शर्मिलाकुवर योगेंद्रसिंह रावल, दिव्यप्रभा रवींद्रसिंह जमादार, दिग्विजयसिंह छत्रसिंह रावल व देवेंद्रसिंह छत्रसिंह रावल यांच्या मातोश्री आणि महाराष्ट्र राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांच्या आजी होत.

सारंगखेडा संस्थानचे राजपुत्र श्रीमंत राजे नानासाहेब छत्रसिंह रावल यांच्या घराण्यात त्यांचे नाते जोडले गेले होते. त्यांच्या पश्चात एकूण सात अपत्ये, नातवंडे, पुतणे तसेच मोठा आप्तपरिवार आहे.

# अर्णव पाटीलच्या उपकरणाची राज्यस्तरावर निवड



प्रतिनिधी । नंदुरबार

**येथील श्रॉफ हायस्कूलचा विद्यार्थी अर्णव दिनेश पाटील याने शेतकऱ्यांसाठी तयार केलेल्या जीवा अँड शिवा द फार्मर्स फ्रेंड या उपकरणाला जिल्ह्यात प्रथम क्रमांक प्राप्त होवून राज्यस्तरावर निवड झाली आहे. त्याबद्दल प्रजासत्ताकदिनी त्याचा पालकमंत्री ना. योगेश कदम यांच्याहस्ते सन्मान करण्यात आला.**

अर्णव पाटील याने तयार केलेल्या जीवा या उपकरणात पाच व शिवा या उपकरणात पाच असे दहा ॲप्लीकेशन्स आहेत. जीव हे उपकरण कोणत्याही विद्युत प्रवाहाशिवाय चालते. त्यात परीक्षण मातीचे करण्यासाठी पीएच मीटर, मातीतील ओलावा पाहण्यासाठी मोईश्चर मीटर, हवेचा वेग व दिशा पाहण्यासाठी विंड वेलोसिटी मीटर प्रकाशाची तीव्रता मोजण्यासाठी लक्स मीटर व पिकांवरील अतिसूक्ष्म गोष्टी पाहण्यासाठी मायक्रोस्कोप अशा गोष्टी तयार केलेल्या आहेत. तर शिवा हे उपकरण ३.७ व्होल्टवर चालते. ही बॅटरी रिचार्जेबल आहे. यात सोलर प्लेट चार्जिंग करण्यासाठी वापरण्यात आलेली आहे. रात्री अंधारात पाहण्यासाठी टॉर्च लाईट, जमिनीचे तापमान तपासण्यासाठी थर्मामीटर, बांधावर तारेच्या कुंपणावर सोडलेले करंट तपासण्यासाठी एसी सप्लाय डिटेक्टर व बिबट्या किंवा चोर लुटारूंपासून संरक्षण होण्यासाठी हाय टेन्शन सप्लाय याची योजना केलेली आहे. शेतकरी स्वतः हे उपकरण वापरू शकतात. उपकरण छोटे असल्याने ने-आण करण्यासाठी कुठलीही गैरसोय होत नाही. अर्णव पाटील याच्या या उपकरणाला २७ व्या नंदुरबार जिल्हा विज्ञान प्रदर्शनात प्रथम क्रमांक प्राप्त झाल्याबद्दल अर्णव व शिक्षिका चेतना पाटील यांचा गृहराज्यमंत्री योगेश कदम, जिल्हाधिकारी डॉ.मिताली सेठी, पोलीस अधीक्षक श्रवण दत्त एस., मुख्य कार्यकारी अधिकारी नमन गोयल यांच्याहस्ते सन्मानित करण्यात आले. त्याबद्दल संस्थेचे चेअरमन ॲड. रमण शहा, सचिव डॉ. योगेश देसाई, प्राचार्य सुषमा शाह, उपमुख्याध्यापक प्रशांत बागुल, पर्यवेक्षिका सीमा पाटील, पर्यवेक्षक भिकू त्रिवेदी आदींनी कौतुक केले.

# एकाच पटांगणात संपूर्ण प्रशासन

## ● कर्ले गावाने उभा केला विकासाचा नवा आदर्श

प्रतिनिधी । दोंडाईचा

**शहराप्रमाणे एखाद्या ग्रामीण भागात प्रशासकीय व्यवस्था उभी राहू शकते याचे उत्तम उदाहरण म्हणजे कर्ले गाव असून एकाच पटांगणमध्ये ग्रामपंचायत कार्यालय, तलाठी कार्यालय, प्राथमिक आरोग्य उपकेंद्र, जिल्हा परिषद मराठी शाळा आणि समोर गावाचा मुख्य रस्ता त्यावर शोभेची झाडे, असे दिमाखदार काम कर्ले गावात झाले आहे. कर्ले गावाचा आदर्श इतर गावांमध्ये देखील घेण्यात यावा, असे आवाहन जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी केले.**



कर्ले (ता.शिंदखेडा) येथे श्री. रावल यांच्याहस्ते ग्रामपंचायत इमारत, तलाठी कार्यालय या प्रशासकीय पटांगणमध्ये पेव्हर ब्लॉक, आय लव्ह कर्ले नाव, ग्रामपंचायत, तलाठी कार्यालय यासह विविध विकासकामांचे लोकार्पण सेल्फी पॉईंट, कर्ले गाव ते फाटापर्यंत तयार करण्यात आलेल्या जनपथ या रस्त्याचे लोकार्पण, धनदाई माता मंदिर परिसरात बहुउद्देशीय हॉल, त्याच ठिकाणी पेव्हर ब्लॉक, जिल्हा परिषद मराठी शाळा सुशोभीकरण अशा विविध विकास कामांचा लोकार्पण सोहळा पार पडला. त्यात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी सरपंच सीमा दिनेश ठाकरे होत्या.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बाजार समितीचे सभापती नारायण पाटील, गटनेते दगाजी देवरे, नथ्थू पवार, गोकुळ बेडसे, दिनेश ठाकरे, निंबा चव्हाण, प्रफुल्ल पाटील, माजी सरपंच रेखाबाई पवार, साहेबराव पवार, उपसरपंच पंडित वाघ, ग्रा. पं. सदस्य संगीता विठ्ठल चव्हाण, जनाबाई रमेश मोरे, योगिता शेवाळे, सरला सोनवणे, इंदुबाई विक्रम भील, नानाभाऊ ठाकरे, दिनेश देवरे, ग्रामसेविका जयश्री पाटील, तलाठी भाग्यश्री जगताप, कृषी अधिकारी सुनिल देवरे, उपअभियंता गौरव शिंदे, शाखा अभियंता पिंगळे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलतांना ना.रावल यांनी, आम्ही प्रत्येक गावाला निधी देत असतो, त्यातून गावाचा विकास कसा साधायचा ही जबाबदारी सरपंच आणि तेथील प्रमुख पदाधिकारी याची असते. कर्ले गावाला दिलेल्या निधीचा खऱ्या अर्थाने सदुपयोग झाला. कारण पूर्वी फाटा ते कर्ले गाव हे पूर्णतः काटेरी बाभूळ होते. पण आता मात्र या मुख्य रस्त्याच्या कामासाठी मी निधी दिला. पण सरपंच सीमा ठाकरे यांनी दोन्ही बाजूंनी शोभेची झाडे लावली. त्यामुळे अतिशय मनमोहक असे दृश्य दिसते, असे त्यांनी सांगितले. दिनेश ठाकरे म्हणाले की, मंत्री साहेबांनी कर्ले गावाचा चेहरामोहरा बदलण्यासाठी कोट्यवधी रुपये निधी दिला. पण आमची यादी अजून संपलेली नाही. आम्हाला धुळ्याकडे जाण्यासाठी शॉर्टकट रस्ता मंजूर केला. त्याचप्रमाणे नंदुरबारकडे जाण्यासाठी केवळ पाच किमीचा कर्ले ते वैदाने रस्ता मंजूर करावा, याशिवाय अनेक विकास कामांची यादीचे यावेळी त्यांनी वाचन केले.

### ■ सोन्याचे कर्ले...

मुख्य रस्त्यावर आता ग्रामपंचायतीच्या मुख्यालयाचे अत्यंत दर्जेदार झालेले काम, बाजूलाच तलाठी कार्यालय, त्याच्या बाजूला सेल्फी पॉईंट, तिथेच प्राथमिक आरोग्य उपकेंद्र, समोर जिल्हा परिषद मराठी शाळा, शाळेला लागून दोन एकर युवकांना खेळण्यासाठी मैदान, एवढे चांगले नियोजन कर्ले गावाच्या सरपंच सीमा ठाकरे यांनी केल्याने आता कर्ले गावाला पूर्वी सोन्याचे कर्ले म्हटले जात होते. आज खऱ्या अर्थाने पूर्वीप्रमाणे सोन्याचे कर्ले असे म्हणता येईल, अशा शब्दात मंत्री रावल यांनी कर्ले गावाचा गौरव केला.

# समाजातील वधू-वरांनी नोकरीपेक्षा निर्व्यसनी, उद्योगी जोडीदार शोधावा : आ.अमोल जावळे

● सूर्यवंशी क्षत्रिय मराठा समाजाचा वधू-वर परिचय मेळावा व पुस्तिका प्रकाशन सोहळा उत्साहात

प्रतिनिधी । रावेर

**मराठा समाजातील वधू-वरांनी जोडीदार निवडताना केवळ नोकरीकडे न पाहता उद्योगी, निर्व्यसनी, कुटुंब वत्सल व समाजहित जपणारा जोडीदार निवडावा, असे आवाहन आमदार अमोल जावळे यांनी केले.**



आजच्या सोशल मीडिया व संगणक युगात शिक्षण व नोकरीच्या अपेक्षांमुळे विवाहाचे वय वाढत आहे. त्यामुळे समाजात अनेक अडचणी निर्माण होत आहेत. पालकांनी दोन पावले मागे जात समाजहिताचा विचार करून समाजातीलच योग्य जोडीदार निवडावा, असेही त्यांनी स्पष्ट केले. रावेर तालुका सूर्यवंशी क्षत्रिय मराठा समाजाच्या वतीने २५ जानेवारी रोजी रेशीमबंध नात्यांचे वधू-वर परिचय मेळावा व पुस्तिका प्रकाशन सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी समाज प्रबोधक गुलाबराव महाराज पाटील (चिखली, ता. मुक्ताईनगर) यांनी मार्गदर्शन करत वधू-वरांनी लग्न वयातच करावे, असे आवाहन केले. या मेळाव्यात वधू-वरांची माहिती असलेल्या पुस्तिकेचे प्रकाशन जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या संचालिका जनाबाई महाजन व राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रदेश प्रवक्ते प्रतिभा शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समाजाचे अध्यक्ष सोमनाथ मराठे होते. यावेळी माजी नगराध्यक्ष ज्ञानेश्वर महाजन, माजी अध्यक्ष भानुदास पाटील, बाजार समितीचे सभापती प्रल्हाद पंडित पाटील, शिवसेना जिल्हाप्रमुख योगीराज पाटील, माऊली फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. संदीप पाटील, रावेर तालुका मराठा विकास मंडळाचे अध्यक्ष राहुल पंडित, नंदुरबार मराठा समाजाचे अध्यक्ष श्याम मराठे, तसेच महाराष्ट्र, मध्यप्रदेश व गुजरात येथून आलेले अनेक मान्यवर उपस्थित होते. मेळाव्यात १०४ वधू व २९५ वरांनी आपली माहिती नोंदवून मुलाखती दिल्या. तीन राज्यांतील समाजबांधवांचा मोठा प्रतिसाद या उपक्रमाला मिळाला. प्रास्ताविक प्रा.उमाकांत महाजन यांनी केले. सूत्रसंचालन हेमलता मराठे व भूषण चौधरी यांनी केले. मेळावा यशस्वी करण्यासाठी रावेर तालुक्यातील मराठा समाज मंडळाचे पदाधिकारी व समाजबांधवांनी परिश्रम घेतले.

## कोटेचा महाविद्यालयात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा उत्साहात

प्रतिनिधी । भुसावळ

**शहरातील प.क. कोटेचा महिला महाविद्यालयात मराठी भाषा, संस्कृती व परंपरेचा जागर करत विद्यार्थिनींमध्ये मातृभाषेविषयी अभिमान निर्माण करण्याच्या उद्देशाने मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा मराठी विभाग व कला वाड्मय मंडळाच्या संयुक्त विद्यमाने साजरा करण्यात आला.**

या पंधरवड्यात मराठी विभागामार्फत निबंध स्पर्धा, काव्यवाचन स्पर्धा, भित्तिपत्रिका स्पर्धा, पारंपरिक वेशभूषा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. समारोप प्रसंगी प्रा.विनोद भालेराव यांनी मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त महाविद्यालयात राबविण्यात आलेल्या विविध शैक्षणिक, सांस्कृतिक व साहित्यिक उपक्रमांची माहिती दिली. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ.जीवन धांडे म्हणाले की, मातृभाषा ही केवळ संवादाचे साधन नसून ती आपल्या संस्कृतीची ओळख आहे. मराठी भाषेतूनच आपली संस्कारशक्ती, विचारधारा आणि सामाजिक भान घडते. जागतिकीकरणाच्या युगात मराठी भाषेचा अभिमान बाळगणे ही काळाची गरज आहे. घर, शाळा आणि समाज या तिन्ही स्तरांवर मराठीचा वापर वाढविला पाहिजे. भाषा जपली तरच संस्कृती टिकते आणि संस्कृती टिकली तरच माणूस समृद्ध होतो, असेही त्यांनी सांगितले. काव्यवाचन स्पर्धेत प्रथम पारितोषिक जयश्री सोनवणे यांनी, तर द्वितीय पारितोषिक हर्षाली लोहार यांनी पटकावले. निबंध लेखन स्पर्धेत प्रथम पारितोषिक तेजस्विनी सपकाळे, तर द्वितीय पारितोषिक मेघा सपकाळे यांनी मिळविले. पारंपरिक वेशभूषा स्पर्धेत मयुरी गायकवाड, हर्षाली लोहार, नारायण मोकाशी आणि यामिनी भोई यांनी पारितोषिके पटकावली.

## थोडक्यात

### राजेंद्र परदेशी, अर्जुन पाटील यांचा सत्कार

**भडगाव ।** तालुक्यातील वाडे येथील हनुमान विविध कार्यकारी सहकारी सोसायटीतर्फे भडगाव शेतकरी सहकारी संघाचे नवनिर्वाचित चेअरमन राजेंद्र परदेशी यांचा तसेच संस्थेचे सचिव अर्जुन पाटील यांनी २२ वर्ष चांगली सेवा बजावल्यामुळे या दोघांचा शाल, रुमाल टोपी आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.कजगाव-वाडे जिल्हा परीषद गटाचे सदस्य डॉ. कर्तारसिंग परदेशी यांच्याहस्ते हा सत्कार करण्यात आला. यावेळी सोसायटीचे चेअरमन उदयसिंग परदेशी, भडगाव शेतकरी सहकारी संघाचे माजी व्हाईस चेअरमन देविदास माळी, सोसायटीचे माजी चेअरमन नारायण परदेशी, संचालक डॉ.दिवाकर पाटील, कैलास माळी, अशोक परदेशी, सुपडु मोरे, माजी उपसरपंच शामराव माळी, माजी सरपंच भारत मोरे, वामन माळी, सुभाष परदेशी, नामदेव माळी, सचिव अर्जुन पाटील, दिलीप पाटील, ज्ञानेश्वर माळी, प्रविण पाटील, दुलीचंद परदेशी आदी उपस्थित होते.

### कोरपावली येथे ७७ वा प्रजासत्ताक दिन साजरा

**यावल ।** तालुक्यातील कोरपवली ग्रामपंचायत कार्यालयात भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी सरपंच विलास अडकमोल यांनी सांगितल्याप्रमाणे सकाळी ७.३० वाजता आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याची मुलगी तसेच चौथीची विद्यार्थिनी फाल्गुनी चेतन महाजन हिच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आला. यावेळी संविधानाच्या प्रतीचे पूजन करून संविधानाची प्रास्ताविका वाचण्यात आली. याप्रसंगी सरपंच, उपसरपंच, ग्रा.पं.सदस्य तसेच विविध कार्यकारी सोसायटीचे पदाधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी, तलाठी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### दहिगावात अखंड हरिनाम, संतमुक्ताबाई चरित्र सप्ताह

**यावल ।** तालुक्यातील दहिगाव येथील श्रीराम मंदिर लेवा पंचमंडळातर्फे २६ जानेवारीपासून अखंड हरिनाम व संत मुक्ताबाई चरित्र संकीर्तन सप्ताहास प्रारंभ झाला आहे. याचा समारोप २ रोजी काल्याच्या कीर्तनाने होणार आहे. आयोजन हरिभक्त परायण नामदेव गुरुजी व हरिभक्त परायण उद्धव महाराज दहिगाव यांच्या प्रेरणेने करण्यात आले आहे. दहिगाव येथील श्रीराम मंदिर लेवा पंच मंडळातर्फे आयोजित सप्ताहात सकाळी पाच ते सहा काकड आरती सहा ते सात विष्णुसहस्रनाम. सकाळी सात ते अकरा ज्ञानेश्वरी पारायण व दुपारी दोन ते चार ज्ञानेश्वरी पारायण असे दैनंदिन कार्यक्रम असून यात २६ जानेवारी रोजी ज्ञानेश्वर बुवा पुलगाव यांचे कीर्तन तर २७ रोजी दत्तात्रय बुवा साखरी यांचे कीर्तन झाले.

## अन् कुत्र्याच्या पिलांचा वाचला जीव..!

प्रतिनिधी । चोपडा

**शहरात रात्रीच्या वेळी रस्त्यावर आलेल्या मुक्या प्राण्याचा जीव वाचवून माणुसकीचा आदर्श घालून देणारी घटना घडली आहे. चोपडा येथील संकेत सुनिल ठाकरे यांनी सजगता दाखवत रस्त्याच्या मधोमध अडचणीत सापडलेल्या कुत्र्याच्या पिल्लाचा जीव वाचवला.**



रात्रीच्या अंधारात चोपडा शहरातील रस्त्यावर पडलेले कुत्र्याचे पिल्लू त्यांच्या निदर्शनास येताच त्यांनी तत्काळ वाहन थांबवले. वेगाने येणाऱ्या वाहनांमुळे पिल्लाचा जीव धोक्यात येऊ शकत होता. त्यांनी त्या पिल्लाला सुरक्षित ठिकाणी हलवून पाणी व प्राथमिक मदत दिली. वेळेत मदत मिळाल्यामुळे त्या मुक्या जीवाचा प्राण वाचला.

या घटनेनंतर संकेत सुनिल ठाकरे यांनी चोपडा शहरातील नागरिकांना आवाहन केले की, 'रात्री वाहन चालवताना सावकाश चालवा. रस्त्यावर आलेल्या मुक्या प्राण्यांकडे दुर्लक्ष करू नका. थोडीशी काळजी घ्या आणि माणुसकी जपल्याने अनेक निष्पाप जीव वाचवू शकते. चोपडा शहरात वाढत्या वाहनसंख्येमुळे मुक्या प्राण्यांचे अपघात वाढत असून, अशा घटनांमुळे नागरिकांनी अधिक सजग राहणे गरजेचे असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. हा उपक्रम चोपडा तालुक्यासाठी प्रेरणादायी ठरत आहे.

## रेड रिबिन क्लबतर्फे ऐनपूर महाविद्यालयात व्याख्यान

प्रतिनिधी । ऐनपूर

**येथील सरदार वल्लभभाई पटेल कला व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना एककामार्फत एड्स मुक्त महाराष्ट्र या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.**

व्याख्यानाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ जे.बी. अंजने यांनी एड्सग्रस्त व्यक्तीशी हात मिळवणी केली, त्यांचा स्पर्श झाला तर एड्स होतो, हा समाजातील गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न युवकांनी करावा, असे आवाहनही त्यांनी केले. विद्यार्थ्यांना एड्स मुक्त महाराष्ट्र हे ध्येय साध्य करायचे आहे म्हणून युवकांनी एड्स होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. रक्ताद्वारे आजाराचे संक्रमण होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे, असे विश्वास पाटील यांनी त्यांच्या व्याख्यानामध्ये सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक डॉ.व्ही.एन. रामटेके यांनी केले. यशस्वीतेसाठी कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## समूह गीते, नृत्यातून घडवला देशभक्तीचा जागर

● अडावद विद्यालयात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

प्रतिनिधी । अडावद

**येथील सार्वजनिक विद्यालयात भारतीय प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात आणि विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला. यावेळी आयोजित करण्यात आलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी समूह गीते आणि नृत्य सादर करत देशभक्तीचा जागर केला.**



कार्यक्रमाच्या सुररुवातीला विद्यालयाचे संचालक हरिष पाटील यांच्याहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर स्काऊटचे ध्वजारोहण पूनम सोनवणे या विद्यार्थिनीने केले. त्यानंतर स्काऊट गाईडच्या विद्यार्थ्यांनी पथसंचलन केले. यावेळी आबासो रामराव गुलाबराव देशमुख पूर्व प्राथमिक, सार्वजनिक खाजगी प्राथमिक व सार्वजनिक माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर समूह गीते आणि नृत्य सादर केले. यावेळी मुख्याध्यापक अशोक कदम, अडावद परिसर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष नंदकुमार देशमुख, उपाध्यक्ष रतीलाल महाजन, सहसचिव मिनाबाई देशमुख, संचालक मनोजकुमार देशमुख, रामकृष्ण पाटील, मधुकर देशमुख, प्रमोद देशमुख, सार्वजनिक खाजगी शाळेचे चेअरमन नामदेव पाटील, सेवानिवृत्त मुख्याध्यापक जी.व्ही. पाटील यांच्यासह गावातील विविध संस्थाचे पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते. कवायत संचलन सचिन पाटील यांनी तर ध्वजसंचलन नितीन महाजन यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## निंभोरा येथे साडेतीन तास चालली ग्रामसभा

प्रतिनिधी । रावेर

**निंभोरा येथील ग्रामपंचायतीची २६ जानेवारी रोजी झालेली ग्रामसभा किरकोळ अपवाद वगळता अगदी शांतता मार्गाने अभूतपूर्व अशी दुपारी बारा ते साडेतीन वाजेपर्यंत अशी तब्बल साडेतीन तास चालली. सरपंच निर्मला कोळी अध्यक्षस्थानी होत्या.**



ग्रामसभेत माजी उपसरपंच विवेक ठाकरे यांच्या संकल्पनेतून निंभोरा गाव सेवा नियंत्रण समिती स्थापन केल्याचा सर्वानुमते ठराव करण्यात आला. यापुढे ग्रामपंचायतीच्या सर्वच खात्यातून निधी खर्च करतांना या समितीची परवानगी बंधनकारक असल्याचे ठरावात नमूद असून मुदत संपत असल्याने विद्यमान पदाधिकारी व आगामी काळात प्रशासकांनी मनमानी कारभार करू नये, यासाठी ग्रामस्थांचा हा निर्णय व ठराव एकप्रकारे पायबंद व नवा पायंडा असल्याची चर्चा आहे. दरम्यान, विद्यमान ग्रामपंचायत कमिटीच्यावतीने चौदाव्या वित्त आयोग, पंधरावा वित्त आयोग ग्रामनिधी आणि स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या निधीतून झालेली कामे अत्यंत नित्कृष्ठ दर्जाची असणे, सुरु असलेल्या व झालेल्या विकास कामांच्या ठिकाणी माहितीचे फलक नसणे, काही एजन्सींना बेकायदा अँडव्हान्स रक्कम खात्यातून देणे, कृती आराखड्यातील कामे वारंवार बदलणे, कामे अपूर्ण असतांना निधी खर्च टाकणे अशा पंचायतीच्या अनेक बाबी संशयास्पद असल्याने २०२१ पासून २०२६ पर्यंत विद्यमान ग्रामपंचायत कमिटीच्या कार्यकाळातील गेल्या पाच वर्षांच्या सर्व प्रकारच्या झालेल्या कामांची सखोल चौकशी करण्याचा या ग्रामसभेने ठराव केला. ठरावाची नक्कल व प्रस्ताव जिल्हा परिषद सीईओंना तक्रार स्वरूपात सादर करून त्रयस्थ समितीकडून चौकशी नेमण्यासाठी पाठपुरावा करण्याचे ठरले. उपसरपंच रंजना पाटील, सदस्या मंदाकिनी बऱ्हाटे, सतिष पाटील, रेखा कोळंबे, अमोल खाचणे यांनी चर्चेत भाग घेतला.

## चाळीसगावी प्रस्तावित अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयास एरंडोल तालुक्यातून विरोध

प्रतिनिधी । एरंडोल

**चाळीसगाव येथे स्वतंत्र अपर जिल्हाधिकारी कार्यालयाचा प्रस्ताव कार्यान्वित करण्याच्या हालचाली महसूल यंत्रणेतर्फे सुरू झाल्या आहेत. त्यात एरंडोल तालुक्याचा समावेश करण्याबाबत शासन स्तरावर प्रक्रिया सुरू आहे. वास्तविक एरंडोलपासून जिल्हाधिकारी कार्यालय असलेले जळगाव अवघ्या ३० कि.मी. अंतरावर आहे. याउलट एरंडोल ते चाळीसगाव हे ७२ कि.मी. अंतर आहे. एरंडोलपासून चाळीसगाव हे जळगावच्या तुलनेत अडीच पट लांब अंतरावर आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयातील कामांसाठी एरंडोल तालुक्यातील नागरिकांना एवढ्या लांब अंतरावर जाण्याची शिक्षा कशासाठी? असा संतप्त सवाल केला जात आहे.**

एरंडोल तालुका चाळीसगावच्या अपर जिल्हाधिकारी कार्यालयास जोडल्यास नागरिकांना मोठा आर्थिक भुर्दंड व वेळेचा अपव्यय मोठ्या प्रमाणात होणार आहे. विशेष म्हणजे एरंडोल ते चाळीसगाव जाण्यासाठी अडीच तास व परत येण्यासाठी अडीच तास लागतो. यासाठी तालुक्यातून चाळीसगावला एरंडोल तालुका जोडण्यास तीव्र विरोध होत असून या विरोधाचे रूपांतर तीव्र आंदोलनात होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. एरंडोल तालुका हा ब्रिटिशकालीन तालुका असून त्यात एकूण ६५ गावे आहेत. तालुक्याच्या पुर्व भागातील जवळपास २५ गावे गिरणा नदीकाठ परिसरातील असून गिरणानदी ओलांडली तर जळगाव हे अवघ्या १० कि.मी. अंतरावर आहे. एरंडोल हे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ वर वसलेले असून राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणामुळे जलदगतीने नागरिकांना जळगाव गाठता येते. एकंदरीत एरंडोल तालुक्यातील जनतेसाठी जळगावचे जिल्हाधिकारी कार्यालय हे अत्यंत सोयीचे असल्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयातील कामांबरोबर इतर शासकीय कार्यालयातील व न्यायालयातील कामे सहजगत्या पार पाडले जाऊ शकतात. मग अशा सर्व दृष्टीने जळगाव येथे अनुकूलता असतांना चाळीसगावला एरंडोल जोडण्याचा खटाटोप कशासाठी? या विषयावर तालुक्यातील जनतेमध्ये संतापजनक प्रतिक्रिया उमटत आहे. असे असतांना जळगाव सोडा आणि चाळीसगाव जोडा अशी भुमिका शासनाने घेऊ नये, अशी जोरदार मागणी होत आहे. काखेत कळसा अन् गावाला वळसा असा हा प्रकार एरंडोलची जनता कदापि सहन करणार नाही. सर्व बाबींचा विचार करता सर्व दृष्टीने चाळीसगाव हे एरंडोलच्या जनतेला अत्यंत गैरसोयीचे, त्रासदायक व अन्यायकारक होणार आहे. म्हणूनच सोडा जळगाव अन् चला चाळीसगाव या भुमिकेला एरंडोलच्या नागरिकांकडून जोरदार आक्षेप घेतला जात आहे. वास्तविक एरंडोल येथील एरंडोली ही महाराष्ट्रात सर्वत्र सुपरिचित असतांना येथील जनतेवर अन्याय कशासाठी व्हावा, असा सूर सर्व स्तरातून उमटत आहे.

## नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे पंचनामे त्वरित करा

● आमदार प्रा. चंद्रकांत सोनवणे यांचे महसूल विभागाला निर्देश



प्रतिनिधी । चोपडा

शहरासह चोपडा तालुक्यात मंगळवार दि. २७ जानेवारी रोजी सायंकाळी अचानक आलेल्या अवकाळी पाऊस, गारपीट व वादळामुळे शेती पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. आडगाव, विरवाडे, विष्णापूर, नागलवाडी तसेच तालुक्यातील आदिवासी भागातील अनेक गावांमध्ये गहू, हरभरा, कांदा, केळी तसेच इतर पिके आडवी पडल्याने शेतकरी मोठ्या आर्थिक अडचणीत सापडले आहेत.

अचानक आलेल्या या नैसर्गिक संकटामुळे उभ्या पिकांचे नुकसान होऊन उत्पादनात घट होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. काही ठिकाणी जोरदार वाऱ्यामुळे झाडे उन्मळून पडली असून विजेच्या तारा तुटल्याने वीजपुरवठा खंडित झाला होता. यामुळे ग्रामस्थांची गैरसोय झाली. या पार्श्वभूमीवर चोपडा विधानसभा क्षेत्राचे आमदार प्रा. चंद्रकांत सोनवणे यांनी बुधवारी नुकसानग्रस्त भागांना भेट देत प्रत्यक्ष शेतात जाऊन पाहणी केली. त्यांनी शेतकरी व नागरिकांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या तसेच संकटाच्या काळात शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे, असा दिलासा दिला. पाहणी दौऱ्यादरम्यान तहसीलदार भाऊसाहेब थोरात, तालुका कृषी अधिकारी दिपक साळुंखे, गटविकास अधिकारी एन. आर. पाटील तसेच महसूल व कृषी विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. आमदार प्रा. चंद्रकांत सोनवणे यांनी अवकाळी पाऊस व गारपीटग्रस्त शेतकऱ्यांच्या शेती पिकांचे तातडीने पंचनामे करून अचूक व पारदर्शक अहवाल शासनाकडे सादर करण्याचे स्पष्ट निर्देश प्रशासनाला दिले. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना लवकरात लवकर आर्थिक मदत, पीक विमा व शासकीय सवलती मिळाव्यात, यासाठी प्रशासनाने संवेदनशीलतेने व तत्परतेने काम करावे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

## नायब तहसीलदार झांबरे यांचा जिल्हाधिकाऱ्यांकडून गौरव



प्रतिनिधी । मुक्ताईनगर

**येथील तहसील कार्यालयातील निवडणूक नायब तहसीलदार प्रदीप झांबरे यांचा उत्कृष्ट अधिकारी म्हणून नुकताच जिल्हाधिकारी रोहन घुगे यांच्या हस्ते प्रमाणपत्र व बक्षीस देऊन गौरव करण्यात आला.**

सन २०२४-२५ मध्ये मतदार यादी दुरुस्ती, मतदार याद्यांचे अद्यावतीकरण, मतदार नोंदणी व वगळणी असा शासकीय उपक्रम कौशल्यपूर्ण राबविल्याबद्दल प्रदीप झांबरे यांचा जिल्हाधिकारी रोहन घुगे यांचे हस्ते स्मृतिचिन्ह प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. जिल्ह्यातील अन्य अधिकाऱ्यांनाही याप्रसंगी उत्कृष्ट कर्मचारी, अधिकारी म्हणून गौरवण्यात आले.